खरेदी विभाग

**"मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर"**

**विषय – सन २०२२-२३ (डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३) अखेर गाईचे शुद्ध तुप अल्प मुदतची ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेबाबत...**

मान्यतेसाठी सविनय सादर,

**अधिनियमातील तरतुद**- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम १४/२००४ मधील तरतुद क्रं.२१ (१) (घ) भक्तांना जेवण देणे व अन्नछत्र चालवणे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय** –१. मा.व्य.स.दि.२४.०१.२०२२ चे सभेतील निर्णय क्र.१५

२. मा.व्य.स.दि.२१.०५.२०२२ चे सभेतील निर्णय क्र.३३८

३. मा.व्य.स.दि.२६.०८.२०२२ चे सभेतील निर्णय क्र.४९१

४. मा.तदर्थ समितीचे दि.१८.१०.२०२२ चे सभेतील निर्णय

५. मा.तदर्थ समितीचे दि.०२.११.२०२२ चे सभेतील निर्णय

६. मा.तदर्थ समितीचे दि.२१.११.२०२२ चे सभेतील निर्णय

७. मा.तदर्थ समितीचे दि.०५.१२.२०२२ चे सभेतील निर्णय

**प्रास्ताविक -** संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार भांडार विभागाने सन २०२२-२३ या वर्षाकरिता गाईचे शुद्ध तुप खरेदी करणेकामी Estimated Cost काढण्यासाठी माहे- नोव्हेंबर २०२१ मध्ये चार पुरवठाधारकांकडून ई-मेलद्वारे प्रति क्विंटल दर मागविलेले होते. त्याची सरासरी रु.३८,८२०/- प्रति क्विंटल अशी होती.

भांडार विभागाने सन २०२२-२३ करिता (माहे एप्रिल-२०२२ ते मार्च-२०२३) साईभक्तांना लाडूप्रसाद सेवा देण्यासाठी आवश्यक ८५०० क्विंटल गाईचे शुद्ध तुप खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३२,९९,७०,०००/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०१.२०२२ चे सभेतील निर्णय क्र.१५ अन्वये मान्यता घेऊन, प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास सादर केलेला होता.

मा.तदर्थ समितीचे दि.१८.०२.२०२२ चे सभेतील निर्णय क्र.५३३ नुसार महाराष्ट्र शासन उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि.०१.१२.२०१६ शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारीत नियमावलीनुसार, मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी नोंदविलेल्या निरिक्षण व दिलेल्या निर्देशानुसार अटींचा समावेश करुन, नवीन ई-निविदेचा मसुदा तयार करण्यात आलेला असून, तो चक्रिय पद्धतीने मा.तदर्थ समितीचे दि.२१.११.२०२२ चे सभेसमोर सादर करण्यात आलेला होता.

सदर सभेतील निर्णय क्रं. ६०१- *"प्रस्ताव आणि प्रसतावासोबत निविदेचा मसुदा सादर केला आहे. सदर प्रस्तावात किंवा निविदेच्या मसुद्याप्रमाणे आयएसआय (ISI) १६३२६:२०१५ प्रमाणे मानकांचा उल्लेख नाही. समितीचे सदस्य मा. डॉ. भोसले साहेब यांनी ही गोष्ट लक्षातआणून दिली. यापूर्वीचे दि.१८.१०.२०२२ चे निर्णयात मानकांचा उल्लेख नाही ही गोष्ट नमुद केली होती. आजचे सभेत या चर्चे वेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जाधव, प्रशासकीय अधिकारी श्री. किसवे, खरेदी अधिकारी श्री. दिपक थोरात यांना स्विस चॅलेंज पध्दत आणि आयएसआय (ISI) १६३२६:२०१५ प्रमाणे निविदा मागवितांना किंवा अभिव्यक्ती स्वारस्य बोलवतांना मानकांचा उल्लेख करणेबाबत आवश्यक बाबींचा उल्लेख करणे आवश्यक असूनही केले नसल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामुळे तुप खरेदीवर निर्णय घेता येणार नाही. यावर उपस्थित अधिकारी यांनी संभ्रम असल्याचे कथन केले. त्यावर सभेमध्ये समितीचे सदस्य मा.डॉ.राजेंद्र भोसले यांनी आयएसआय मानकांचे बाबतीत भारतीय मानक संस्था, पुणे येथील शास्त्रज्ञ यांचे मार्गदर्शन मोबाईल फोनवर स्पिकर ऑन करुन सर्वांना मिळवून दिले. त्यास मानकाबद्दल संभ्रम दुर झाल्याचे उपस्थितांनी मान्य केले. तदनंतर कर्नाटका मिल्क को-ऑप. फेडरेशनचे डायरेक्टर मार्केटींग यांचेशी देखील मोबाईल फोनवर स्पिकर ऑन करुन त्यांचे संस्थेकडून तुपाचा पुरवठा होऊ शकतो का आणि काय राहिल याबद्दल माहिती मिळवून दिली. त्यांनी माहिती दिली की, टीटीडी (तिरुमला तिरुपती देवस्थान) यांना पुर्वी तुपाचा पुरवठा केला आहे, अशी माहिती दिली. अभिव्यक्ती स्वारस्य व स्विस चॅलेंज पद्धतीने तुपाचा दर पाठविण्यासाठी ई-मेलद्वारे पाठविण्यास सांगितले, त्याप्रमाणे त्यांना पत्र पाठविण्यात यावे. उपरोक्त आयएसआय स्टॅन्डर्ड ग्रेड -१, ग्रेड-२ व ग्रेड-३ चा उल्लेख असावा. त्यात पुरवठा केलेल्या तुपाचे पेमेंट ३० दिवसांचे आंत होईल असा उल्लेख करावा. याशिवाय आणखी निविदा किंवा अभिव्यक्ती स्वारस्य पत्रामध्ये कोणकोणत्या गोष्टीचा उल्लेख असावा याची माहिती समाविष्ठ करण्यासाठी माहिती घेण्याकरिता हेरिटेज कंपनी हैद्राबाद यांचे प्रसिडेंड यांचेशी स्पिकर ऑन करुन मोबाईल फोनवर अध्यक्ष यांनी बोलून माहिती घेतली. संस्थानचे दर्जानुसार तुपाचा पुरवठा करण्यास त्यांनी उत्सुकता दाखविली.अमुल (AMUL) डेअरीचे झोनल ऑफीसर यांचेशी मा.सदस्य डॉ.राजेंद्र भोसले यांनी देखील माहिती घेतली.*

*गोवर्धनचे उच्च पदस्थ यांचेशी मा.सदस्य डॉ.राजेंद्र भोसले यांनी मोबाईल फोनवर स्पिकर ऑन करुन तुप खरेदीचे प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी आवाहन केले त्यास त्यांनी सहमती दर्शविली.*

*भारतीय मानक संस्था, पुणे येथील शास्त्रज्ञ यांनी असे म्हटले की, आताचे ई-निविदेतील मानके चुकीची आहेत. जर तुम्हाला ग्रेड-१चे तुप पाहिजे असेल तर आम्ही तुम्हाला बरोबर मानके सांगु शकतो. तेव्हा तयार केलेल्या ई-निविदेचा मसुदा त्यांना ई-मेलवर पाठवून त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे ई-निविदेचा मसुदा तयार करण्यात यावा व प्रस्ताव मंजुरीसाठी तातडीने म्हणजे दि.२६ नोव्हेंबर, २०२२ पुर्वी पाठवावा.मुदतीत प्रस्ताव न पाठविल्यास जबाबदारी निश्चिती केली जाईल.*

*वरील सर्व गोष्टी आणि अशाच पद्धतीने इतर कामे उत्तम रितीने पार पाडण्यासाठी पुर्णकालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक केलेली असतांना मा.जिल्हाधिकारी व मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांची नेमणूक तदर्थ समितीमध्ये सदस्य व अध्यक्ष म्हणून केल्यामुळे उपरोक्त सर्व गोष्टीची माहिती घेऊन समितीसमोर रितसर प्रस्ताव सादर करुन मंजुर करुन घेण्याऐवजी समितीने निर्णय दिल्यानंतरही समितीच्या निर्णयाचे पालन न करता पुन्हा त्याच विषयावर समितीला जणू पुर्णवेळ कार्यकारी अधिकारी समजुन काम करावे लागत आहे. याच विषयावर उपरोक्त कार्य करण्यासाठी तीन तासाचा वेळ खर्ची पडला आहे."*

सदरचा निर्णय दि.२४.११.२०२२ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. त्यानुसार निर्णयामध्ये नमुद केलेनुसार माहे डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ अखेर गाईचे शुद्ध तुप स्विस चॅलेंज पद्धतीने खरेदीकामी निविदेचा कच्चा मसुदा तयार करुन, सदर मसुद्या दि.२४.११.२०२२ रोजी सायंकाळी ०६.२० वा. श्री.प्रज्योद दहीकर साहेब भारतीय मानक संस्था, पुणे यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आलेला होता.

श्री.प्रज्योद दहीकर साहेब भारतीय मानक संस्था, पुणे यांनी सदर निविदेच्या मसुद्यामध्ये बदल सुचवून सदरचा मसुदा दि.२५.११.२०२२ रोजी सायंकाळी ०४.१५ वा. व्हॉटस अॅपद्वारे परत पाठविलेला आहे. श्री.दहीकर साहेब यांनी निविदेमध्ये BIS मानकांबाबत सुचविलेप्रमाणे निविदेमध्ये बदल करण्यात आलेले आहेत. त्यामुळे आता सदर निविदेचा अंतिम मसुदा मा.तदर्थ समितीसमोर अवलोकनार्थ व मान्यतेस्तव चक्रिय पद्धतीने दि.२९.११.२०२२ रोजी ई-मेलद्वारे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.३०.११.२०२२ रोजी शिर्डी भेटीच्या वेळी पत्र देऊन, खालीलप्रमाणे बदल सुचविलेले आहे.

*"तुप खरेदी लवकरात लवकर करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे चक्रिय पद्धतीने प्रस्ताव तदर्थ समितीपुढे ठेवण्याची परवानगी दिली.*

१. *मसुदा मध्ये 'दरपत्रक' या शब्दाऐवजी अभिव्यक्ती स्वारस्य शब्दाचा वापर करणे.*
२. *ग्रेड १, ग्रेड २, ग्रेड ३ तुपासाठी वेगवेगळ्या किमंती मागविणे आणि मसुदा राज्याबाहेर देखील पाठवावयाचा असल्यामुळे इंग्रजीमध्ये तयार करुन घेणे, या अटीवर प्रस्तावास मान्यता दिली."*

मा.अध्यक्ष महोदय यांचेकडील दि.३०.११.२०२२ रोजीचे पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार निविदा सुचनामध्ये बदल करण्यात येऊन, सदरचा मसुदा दि.०१.१२.२०२२ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांना ई मेल केलेला होता.

त्यानुसार मा.तदर्थ समितीचे दि.२१.११.२०२२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६०१ अन्वये प्रसादालय, मंदिर व लाडूनिर्मिती विभागासाठी सन २०२२-२३ (माहे डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३) अखेर ३००० क्विंटल गाईचे शुद्ध तुप स्विस चॅलेंज पद्धतीने खरेदीकामीची निविदेचा मसुदा अंतिम होणेसाठी तसेच सदर मसुद्यास मान्यता मिळालेनंतर सदरचे तुप स्विस चॅलेंज पद्धतीने खरेदी करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.०५.१२.२०२२ चे सभेत सादर केला असता. सदर सभेत निर्णय क्र.६५१ नुसार *"सुधारीत प्रस्ताव व मसुदा चुकीचा असल्याने चर्चेत ठरल्याप्रमाणे मसुदा कंन्सलटंट कडून पडताळून घ्यावा व तीन दिवसात प्रस्ताव चक्रिय पद्धतीने तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचेकडे पाठविण्यात यावा"* असे ठरले.

संस्थानचे शुद्ध गाईचे तुप व किराणामाल खरेदीकामी मुंबई महानगरपालिकाचे खरेदी विभागात समक्ष जाऊन तेथील निविदाप्रक्रियेची माहिती घेऊन, त्याप्रमाणे संस्थानचे निविदेमध्ये बदल करणेबाबत तदर्थ समितीच्या मा.अध्यक्ष व सदस्यांनी सुचित केलेले आहे.

सदर निर्णयात मा.तदर्थ समितीने दिलेल्या निर्देशानुसार दि.०६.१२.२०२२ रोजी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, खरेदी विभाग, वैद्यकिय संचालक, प्र.खरेदी अधिक्षक, प्र. खरेदी उप अधिक्षक इ. सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी विभाग (Central Purchase Dept.) येथे समक्ष जाऊन तेथील विशेष कार्य अधिकारी श्री.अन्नदाते साहेब यांचेशी चर्चा करुन त्यांना संस्थानची शुद्ध तुप व किराणामाल खरेदी प्रक्रिया व निविदेबाबत माहिती दिली व त्यानंतर सदर प्रक्रियेमध्ये, निविदेमध्ये काही बदल असल्यास त्याबाबत मार्गदर्शन करणेबाबत विनंती केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या / निरिक्षण नोंदविलेले आहेत.

१. संस्थानमार्फत राबविण्यात येत असलेली खरेदी प्रक्रिया ही योग्य पद्धतीने राबविण्यात येत असलेबाबत सांगितले. (ई-निविदा, टेक्नीकल बीड, नमुने मागविणे, नमुने तपासणे, कमर्शिअल बीड उघडणे, आलेला मालाची नमुन्याप्रमाणे तपासणी करणे, लॅब तपासणी करुन घेणे, इ.) फक्त सदर निविदेमधील काही अटींमध्ये बदल सुचविलेले आहेत. त्याप्रमाणे निविदेमध्ये बदल केलेले आहेत.
२. शुद्ध तुपाची खरेदीबाबत तुपाचे नमुने मागविणे, त्यांचे लॅब तपासणी करणे, प्राप्त तुपाची/मालाची लॅब तपासणी करणे, सदर निविदाधारकांची उत्पादन क्षमता, गुणवत्ता या सर्व बाबींची परिपुर्ण पुर्तता करण्यासाठी स्विस चॅलेंज / अभिव्यक्ती स्वारस्य या खरेदी प्रक्रियेपेक्षा ई-निविदा प्रक्रियेद्वारे खरेदी करणे योग्य व सोईचे राहील, तसेच आपल्याकडे सध्या वेळेचे बंधन असल्याने ७ दिवसांचे मुदतीत शॉर्ट टेंडर मागवून खरेदी प्रक्रिया करणे उचित होईल, असे सुचविले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.
३. शुद्ध तुप खरेदीचे निविदा फॉर्ममध्ये ३ वेगवेगळया ग्रेडसाठी दर मागविणे उचित होणार नाही, तीन वेगवेगळया ग्रेडसाठी दर मागविल्यास प्रत्येक ग्रेडसाठी वेगवेगळे दर येतील. यामध्ये ग्रेड II व III चे प्राप्त दर न्युनतम असतील व ग्रेड I चे दर स्विकारलेस न्युनतम दर का स्विकारले नाही वगैरे प्रश्न निर्माण होतील व यामध्ये आक्षेप येऊ शकतो, त्यामुळे तुमची शुद्ध तुपाचे खरेदीची मागणीही एकाच प्रकारची असावी व एकाच ग्रेडसाठी दर मागवावेत असे त्यांनी सुचविले आहे. त्यामुळे सध्या Grade I साठी दर मागविणे उचित होईल.

४. निविदेतील अटीमध्ये लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या मालाचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास माल बदलून द्यावा लागेल. त्या दरम्यान संस्थानला बाहेरुन माल विकत घ्यावा लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेल्या मालच्या किमंतीच्या २ ते ५ टक्के दंड आकारणेबाबत तरतुद होती. मात्र सदरच्या अटीमध्ये सुस्पष्टता असावी म्हणून दंडाची रक्कम निश्चित नमुद करणेबाबत सुचविले. त्यानुसार आपल्या निविदेमध्ये ५ टक्के दंड आकारणेबाबत तरतुद करणे उचित होईल.

५. शुद्ध तुपाचे Shelf Life ९ महिने ते १२ महिने असते, त्यामुळे पुरवठादार फार पुर्वी उत्पादित केलेले तुप पुरवू शकतो म्हणून यामध्ये संस्थानला Fresh शुद्ध तुपाचा पुरवठा व्हावा, म्हणून याबाबत त्यांनी काही कालावधी निश्चित करण्याचे सुचविले होते. त्यास अनुसरुन या निविदेमध्ये जास्तीत जास्त १ महिन्यापुर्वी उत्पादित केलेल्या तुपाचा पुरवठा करणेबाबतच्या अटीचा समावेश करता येईल.

६. संस्थानकडून शुद्ध तुपाची लॅब तपासणी ४ वेगवेगळ्या लॅबकडून करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. यामध्ये CFTRI लॅब, मैसुर यांचे लॅब तपासणीचे रिपोर्ट साधरणतः ४५ ते ६० दिवसांनी प्राप्त होत असतात. दरम्यानचे कालावधीमध्ये तुपाचा वापर होऊन जातो व त्यानंतर रिपोर्ट येत असतो. त्यामुळे सदर तुपाचा रिपोर्ट Norms प्रमाणे नसल्यास लॅब तपासणीचा उद्देश सफल होत नाही. म्हणून शुद्ध तुपाचा वापर होण्यापुर्वी ज्या लॅबकडून लवकरात लवकर रिपोर्ट प्राप्त होऊ शकतो अशा In house Lab/ शासकीय / NABL लॅबकडून सदर शुद्ध तुपाची तपासणी करण्याची पद्धत अवलंबावी असे सुचित केले आहे. या सुचनेनुसार संस्थानच्या लॅब व शासकीय / NABL लॅबकडून तपासणी करुन घेणेबाबत भांडार विभागस कळविता येईल.

७. तसेच निविदेमध्ये अद्यावत उत्पादक संस्थेचा दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना इ. कागदपत्रांची मागणी केलेली होती. त्यामध्ये त्यांनी सविस्तर कागदपत्रे नमुद करणेबाबत सुचविले आहे. त्याप्रमाणे निविदेमध्ये बदल करता येईल.

श्री.अन्नदाते साहेब विशेष कार्य अधिकारी यांनी वरील मार्गदर्शन केल्यानुसार शुद्ध गाईचे तुप खरेदीचे निविदेमध्ये आवश्यक ते सर्व बदल करुन सुधारीत अल्प मुदतीची निविदेचा मसुदा तयार करुन सोबत सादर करण्यात आलेला आहे.

**विभागाचा अभिप्राय** – मा.तदर्थ समितीचे दि.०५.१२.२०२२ चे सभेतील निर्देशानुसार मुंबई महानगरपालिका, मध्यवर्ती खरेदी विभाग येथील विशेष कार्य अधिकारी श्री.अन्नदाते साहेब यांनी शुद्ध गाईचे तुप खरेदीचे निविदेमध्ये केलेले बदल स्विकारुन त्यानुसार सध्या संस्थानचे प्रसादालय, मंदिर व लाडूनिर्मिती विभागासाठी माहे डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३ अखेर आवश्यक अंदाजे ३००० क्विंटल गाईचे शुद्ध तुप अल्प मुदतीची निविदा पद्धतीने खरेदी करावी, असे नम्र मत आहे. वेळेची मर्यादा लक्षात घेता सदरची खरेदी प्रक्रिया जास्तीत जास्त ७ ते ८ दिवसांत पुर्ण करावी लागेल. तसेच दरम्यानचे काळात साईभक्तांची गर्दीमुळे शुद्ध तुपाची आवश्यकता भासल्यास खरेदी नियमावलीतील तरतुद क्रमांक ३.३.२ नुसार स्विस चॅलेज पद्धतीने खरेदी करण्यात आलेल्या तुपाच्या ५० टक्के तुप म्हणजेच ५०० क्विंटल किंवा डिसेंबर- २०२२ अखेर गरजेनुसार आवश्यक असलेले तुप मंजुर दराने, मंजुर पुरवठाधारकाकडून खरेदी करावे लागेल.

**मागणी-** अ) तरी मा.तदर्थ समितीचे दि.०५.१२.२०२२ रोजीचे सभेतील निर्णयानुसार प्रसादालय, मंदिर व लाडूनिर्मिती विभागासाठी सन २०२२-२३ (माहे डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३) अखेर ३००० क्विंटल गाईचे शुद्ध अल्प मुदतीचे निविदेद्वारे खरेदीकामीची निविदेचा मसुदा अंतिम होणेसाठी तसेच सदर मसुद्यास मान्यता मिळालेनंतर सदरचे तुप खरेदी करणेस मान्यता मिळणेस

**ब)** दरम्यानचे काळात तुपाअभावी साईभक्तांना लाडूप्रसाद सेवा देण्यास अडचण येऊ नये म्हणून खरेदी नियमावलीतील तरतुद क्रमांक ३.३.२. नुसार स्विस चॅलेज पद्धतीने खरेदी करण्यात आलेल्या तुपाच्या ५० टक्के तुप म्हणजेच ५०० क्विंटल किंवा डिसेंबर- २०२२ अखेर गरजेनुसार आवश्यक असलेले तुप जुर दराने, मंजुर पुरवठाधारकाकडून तुप खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे समोर चक्रिय पद्धतीने सादर.

Allowed to place the proposal by circulation.
[signature]
9.12.2022
Chairman

(राहुल जाधव)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

स्वतंत्र मुद्रीत पानावर आदेश पारीत केलेला आहे.

(राहुल जाधव)
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य
मा.तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से)
जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य
तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

9.12.2022
(सुधाकर यार्लगड्डा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

MyDocument/NewMeetingLegal**8**

**विषय - सन २०२२-२३ (डिसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३) अखेर गाईचे शुद्ध तुप अल्प मुदतीची ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेबाबत...**

दि.०९.१२.२०२२ रोजी सन २०२२-२३ करिता गाईचे शुद्ध तुप खरेदीबाबतचा प्रस्ताव चक्रिय पद्धतीने सादर करण्यात आलेला होता. त्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येऊन, खालीलप्रमाणे निर्देश देऊन प्रस्ताव मान्य करण्यात आला.

**अ)**

१. मोठ्या प्रमाणावर तुप उत्पादन करणा-या उत्पादकांची संख्या मोजकी आहे. त्यापैकी अनेक मोठे उत्पादक गेली अनेक वर्षापासून ई-निविदेमध्ये सहभाग घेत नव्हते. त्यामुळे उत्तम दर्जेदार व अधिकतम पुरवठाधारकांना या प्रक्रियेत समाविष्ठ करण्यासाठी व पारदर्शक व स्पर्धात्मक प्रक्रियाचा अवलंब करण्यासाठी सदर प्रस्तावामध्ये नमुद शुद्ध तुप खरेदीकामी शासनाच्या सुधारीत खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.२.७ नुसार स्विस चॅलेंज प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

२. कर्नाटक मिल्क फेडरेशनकडून गाईचे शुद्ध तुपाची मुळ किमंत मागवून घ्यावी व तद्नंतर इतर पुरवठाधारकांना स्विस चॅलेंज स्विकारणेबाबत पुढील १० दिवसांची मुदत देण्यात यावी.

३. पुरवठा आदेश देण्यापुर्वी सदर प्रक्रियेमध्ये सहभागी पुरवठाधारकांकडून प्राप्त तुपाचे नमुने BIS व संस्थानचे लॅबमधून तपासणी करुन घेणे.

४. पुरवठाधारकाची मागील ५ वर्षाची एकत्रित सरासरी आर्थिक उलाढाल ७ कोटी असणे अनिवार्य असणेबाबत अटीचा समावेश करण्यात यावा.

५. अधिकतम स्पर्धा होणेकामी स्थानिक, राज्यस्तरीय व राष्ट्रीय नावाजलेल्या इंग्रजी (Times of India, Financial Express) व मराठी वृत्तपत्रात जाहीरात देण्यात यावी.

**ब)** स्विस चॅलेंजद्वारे तुपाची खरेदी प्रक्रिया पुर्ण होऊन पुरवठा आदेश देऊपर्यंत साईभक्तांना लाडूप्रसाद सेवा विनाखंड पुरविणेस अडचण येऊ नये याकरिता, शासनाच्या खरेदी नियमावलीतील तरतुद क्र.३.३.२ नुसार सद्यस्थितीतील पुरवठाधारकास दिलेल्या पुरवठा आदेशाच्या ५०% परिमाणासाठी पुनर्प्रत्ययी पुरवठा आदेश देण्यात यावा.

दिनांक:०९/१२/२०२२

9.12.2022

**(डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.)**
जिल्हाधिकारी अहमदनगर तथा सदस्य
तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**(सुधाकर यार्लगड्डा)**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर
तथा अध्यक्ष, तदर्थ समिती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी